RNI No. MAHBIL /2009/35530

सत्यमेव जयते

# महाराष्ट्र शासन राजपत्र

## असाधारण भाग चार

वर्ष १२, अंक २६ ] शुक्रवार, ऑगस्ट ७, २०२६/श्रावण १६, शके १९४८ [पृष्ठे ३, किंमत : रुपये २३.००

**असाधारण क्रमांक ६२**

**प्राधिकृत प्रकाशन**

**महाराष्ट्र विधानमंडळाचे अधिनियम व राज्यपालांनी प्रख्यापित केलेले अध्यादेश व केलेले विनियम.**

**अनुक्रमणिका**


| | |
|---|---|
| **सन २०२६ चा महाराष्ट्र अध्यादेश क्रमांक ११.—** महाराष्ट्र जमीन महसूल संहिता, १९६६ यात आणखी सुधारणा करण्यासाठी अध्यादेश. .. .. .. | **पृष्ठे** १-३ |


**महसूल व वन विभाग**

मंत्रालय, मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरू चौक,
मुंबई ४०० ०३२, दिनांक ७ ऑगस्ट २०२६.

**MAHARASHTRA ORDINANCE No. XI OF 2026.**

AN ORDINANCE

FURTHER TO AMEND THE MAHARASHTRA LAND REVENUE CODE, 1966.

**सन २०२६ चा महाराष्ट्र अध्यादेश क्रमांक ११.**

**महाराष्ट्र जमीन महसूल संहिता, १९६६ यात आणखी सुधारणा करण्यासाठी अध्यादेश.**

**ज्याअर्थी**, राज्य विधानमंडळाच्या दोन्ही सभागृहांचे अधिवेशन चालू नाही;

१९६६ चा महा. ४१. **आणि ज्याअर्थी,** यात यापुढे दिलेल्या प्रयोजनांकरिता, महाराष्ट्र जमीन महसूल संहिता, १९६६ यात आणखी सुधारणा करण्यासाठी महाराष्ट्राच्या राज्यपालांनी तात्काळ कार्यवाही करणे जीमुळे आवश्यक व्हावे अशी परिस्थिती अस्तित्वात असल्याबद्दल त्यांची खात्री पटली आहे;

**त्याअर्थी,** आता, भारताच्या संविधानाच्या अनुच्छेद २१३ च्या खंड (१) द्वारे प्रदान केलेल्या अधिकारांचा वापर करून, महाराष्ट्राचे राज्यपाल, याद्वारे, पुढील अध्यादेश प्रख्यापित करीत आहेत :—

संक्षिप्त नाव व प्रारंभ.

**१.** (१) या अध्यादेशास, महाराष्ट्र जमीन महसूल संहिता (सुधारणा) अध्यादेश, २०२६, असे म्हणावे.

(२) तो, तात्काळ अंमलात येईल.

सन १९६६ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ४१ याच्या कलम ४८ ची सुधारणा.

**२.** महाराष्ट्र जमीन महसूल संहिता, १९६६ याच्या कलम ४८ मध्ये, पोट-कलम (७) मधील, "खनिजाच्या बाजार मूल्याच्या पाचपट पर्यंत" या मजकुराऐवजी, "खनिजांसाठी देय असलेल्या दहा पटीइतके स्वामित्वशुल्क" हा मजकूर दाखल करण्यात येईल. १९६६ चा महा. ४१.

## निवेदन

महाराष्ट्र जमीन महसूल संहिता, १९६६ (१९६६ चा महा. ४१) याच्या कलम ४८ मध्ये, खाणी व खनिजे यांवरील सरकारच्या हक्काची तरतूद केली आहे. उक्त कलम ४८ च्या पोट-कलम (७) मध्ये, वैध प्राधिकाराशिवाय खनिजे काढील, हलवील, गोळा करील, दुसऱ्या जागी नेईल, उचलून घेईल किंवा त्यांची विल्हेवाट लावील यांसाठी अशा खनिजांच्या बाजार मूल्याच्या पाचपट पर्यंत शास्तीची तरतूद केली आहे.

**२.** असे निदर्शनास आले आहे की, जिल्हाधिकाऱ्याने निर्धारित केलेले बाजार मूल्य वेगवेगळ्या जिल्ह्यांमध्ये वेगवेगळे असल्यामुळे, वेगवेगळ्या क्षेत्रांमध्ये खनिजांचे बेकायदेशीर उत्खनन, वाहतूक, इत्यादींसाठी वेगवेगळ्या रकमांची शास्ती लादली जाते. असे देखील दिसून आले आहे की, लादलेली शास्ती ही काही प्रकल्पांच्या बाबतीत प्रकल्प खर्चापेक्षाही अधिक झाली आहे, ज्यामुळे असे प्रकल्प ठप्प झाले आहेत. शास्तीची रक्कम ही खनिजांच्या बाजार मूल्यावर आधारित असल्याने, ती मोठी असते. त्यामुळे शास्ती लादण्याविरुद्ध मोठ्या संख्येत अपिले सक्षम प्राधिकरणाकडे दाखल केली जातात. परिणामी शास्तीच्या वसुलीस विलंब होत आहे. म्हणून, अशा खनिजांसाठी देय असलेल्या स्वामित्वशुल्काच्या दहापट इतकी शास्ती लादण्याची तरतूद करण्याच्या दृष्टीने उक्त संहितेच्या कलम ४८ मध्ये सुधारणा करणे इष्ट आहे असे वाटते.

**३.** राज्य विधानमंडळाच्या दोन्ही सभागृहांचे अधिवेशन चालू नाही आणि उपरोक्त प्रयोजनांसाठी, महाराष्ट्र जमीन महसूल संहिता, १९६६ यात आणखी सुधारणा करण्याकरिता, महाराष्ट्राच्या राज्यपालांनी तात्काळ कार्यवाही करणे जीमुळे आवश्यक व्हावे अशी परिस्थिती अस्तित्वात असल्याबद्दल त्यांची खात्री पटली आहे; म्हणून, हा अध्यादेश प्रख्यापित करण्यात येत आहे.

मुंबई,
दिनांक ६ ऑगस्ट २०२६.

**जिष्णु देव वर्मा,**
महाराष्ट्राचे राज्यपाल.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

**विकास खारगे,**
शासनाचे अपर मुख्य सचिव.

ON BEHALF OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, PRINTED AND PUBLISHED BY DIRECTOR, SMT. MANISHA KUMBHAR, PRINTED AT GOVERNMENT CENTRAL PRESS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004 AND PUBLISHED AT DIRECTORATE OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATIONS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004. EDITOR : DIRECTOR, SMT. MANISHA KUMBHAR.